सं.फौ.ख.क्र.१२०७/२०२२
निशाणी १२

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांचा पुरावा**

मी याद्वारे शपथपूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – नवनाथ मुकिंदा पडोळे
वय – ३७ वर्षे,
व्यवसाय – मजुरी
राहणार – मोमिन आखाडा, ता. राहुरी जि.अ.नगर

**सरतपासणी – सहा.सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. एस. गांधले**

१. अपघातातील मयत गजानन हा माझा सख्खा भाऊ होता. त्याचा सन २०२२ मध्ये अपघात झाला होता. अपघात हा मनमाड–गुहा रोडवर झाला होता. घटनेच्यावेळी माझा भाऊ चिंचोली फाटा येथे मोटार सायकलने जात होता. घटनेच्यावेळी मला माझ्या भावाचा फोन आला होता व त्याने सांगितले की, गुहा गावाजवळील चौधरी हॉटेलजवळ अपघात झाला आहे. अपघात हा महेंद्रा बोलेरो चालकाच्या चुकीमुळे झाला आहे. मी हॉस्पिटलला गेलो असता त्याला जास्त मार लागल्यामुळे नगर येथील रुग्णालयात जाण्यास सांगितले. तेथे उपचार घेत असताना माझा भाऊ मयत झाला. सदरचा अपघाताच्या वेळी गाडी चालकाचे नाव मला पोलीसांनी सांगितले नव्हते. मी अपघाताबाबत पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. आता मला फिर्याद दाखवण्यात आली. त्यावरील सही माझी आहे. त्यातील मजकुर मला माहित नाही. त्यास **निशाणी १३** देण्यात येते. पोलीसांनी माझा पुरवणी जबाब नोंदवला नव्हता.

**साक्षीदार अभियोगपक्षाच्या बाजूने साक्ष देत नसल्यामुळे सरकारी वकीलांच्या विनंतीवरुन साक्षीदारास उत्तरसूचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे आहे की, दि. ०६/०७/२०२२ रोजी माझा भाऊ मोमिन आखाडा येथुन गुहा येथे जात असताना चौधरी धाब्याजवळ त्याचा अपघात झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या भावाने फोन करुन मला सांगितले होते की, अपघाताच्या वेळी समोरुन येणा–या पिकअप बोलेरो वाहन क्र. एम. एच. १८ बी. एन. ५३०२ या वाहनामुळे अपघात झाला आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी अपघात स्थळी गेलो असता माझ्या भावाला उपचारासाठी रुग्णालयात नेले होते व माझ्या भावाच्या हाताला, पायाला व डोक्याला गंभिर दुखापत झाली होती. त्यानंतर

सं.फौ.ख.क्र.१२०७/२०२२
निशाणी १२

पुढील उपचारासाठी मॅक्स केअर हॉस्पिटल येथे नेले होते व तेथे तो मयत झाला. हे म्हणणे खरे आहे की, मी पिकअप गाडीच्या चालकाविरुध्द फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, मला पोलीसांकडुन चालकाचे नाव अनिल शामराव पाटोळे असे असल्याचे समजले.

**आरोपी व त्यांचे विधीज्ञांचा वेळोवेळी पुकारा केला असता गैरहजर. सदर फौ.प्र.सं. कलम ३९०(२)(क) अन्वये साक्षीदाराचा उलटतपास नाही, असा आदेश पारीत.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

PANKAJ HILAL PATIL
Digitally signed by PANKAJ HILAL PATIL
Date: 2026.07.29 17:31:21 +0530

(**श्री. पी. एच. पाटील**)
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
न्यायालय क्र.३,राहुरी

राहुरी
दिनांक – २९/०७/२०२६.